**संक्षिप्त फौजदारी केस नं. १४७/२०२४**
**नि. क्र. १८**

**अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र. ०१ चा जबाब शपथेवर सुरु.**

**नाव** – अमित वसंत भाटकर,

**वय**– ४७ वर्षे , **व्यवसाय** – चालक,

**राहणार**– संगमेश्वर, ता. संगमेश्वर, जि.रत्नागिरी.

**अभियोगपक्षातर्फे सरतपास सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री. ए. एल. दड्डेकर यांचेकडून –**

०१. दिनांक ०३/०५/२०२४ रोजी मी माझ्या घरी होतो. असे काही घडले नाही की, त्यावर पोलीसांनी मला पंचनाम्यासाठी बोलावले होते. मौजे धामणी स्टॉपजवळ पोलीसांनी माझ्या एका कागदावर सही दिनांक ०६/०५/२०२४ रोजी घेतली होती. सदर पंचनाम्यावर काहीही लिहिले नव्हते. पोलीसांनी त्यावेळी छायाचित्रे घेतली होती. *(साक्षीदारास प्रकरणातील छायाचित्रे दाखविण्यात आली). अनुक्रमांक ०३ ते ०६ कडील छायाचित्रांत मी, पोलीस, दत्तात्रय कोतवडेकर व शौकत शेख असे आम्ही दिसत आहोत. अनुक्रमांक ०६ कडील छायाचित्रात मी सही करताना दिसत आहे.* पोलीसांनी त्यावेळी मला अपघात झाला असुन तुम्ही पंचनाम्यासाठी हजर रहा, असे सांगितले. पोलीस तेथे जागेचे निरीक्षण करीत होते. *(साक्षीदारास घटनास्थळ पंचनामा व घटनास्थळ नकाशा दाखविण्यात आला). त्या दोन्हींवर अनु. क्र. ०१ चा पंच म्हणून माझी सही आहे. मला पंचनामा व नकाशाचा मजकुर माहित नाही (साक्षीदाराने नमूद केलेल्या स्वाक्षरींना अनुक्रमे* ***निशाणी १९ व २०*** *देणेत आली).*

***(साक्षीदार पूर्वीच्या जबानीशी विसंगत साक्ष देत असल्याने सहा. सरकारी अभियोक्ता यांनी साक्षीदारास उलटतपासाच्या स्वरुपात प्रश्न विचारण्याची परवानगी मागितली, परवानगी मंजूर.)***

०२. हे म्हणणे खरे आहे की, मला व शौकत शेख यांना पोलीसांनी सदर

ठिकाणी पंचनाम्यासाठी पंच म्हणुन हजर रहा, असे बोलावले होते व पोलीसांनी तेथे पंचनामा केला. हे म्हणणे खरे नाही की, घटनास्थळ दत्तात्रय कोतवडेकर यांनी दाखविले होते. साक्षीदार पुढे सांगतो की, घटनास्थळ आम्हाला पोलीसांनी दाखविले होते. हे मला माहिती नाही की, सदरचे ठिकाण जागृत होंडा माऊली मोटार्स समोर होते किंवा कसे. हे मला माहिती नाही की, त्यावेळी रस्त्याच्या कडेला अपघातग्रस्त रिक्षा उभी केलेली होती, अगर कसे.

**०३**. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळी रस्त्याच्या कडेला अपघातग्रस्त रिक्षा उभी केलेली होती, हे मला माहिती नसल्याचे मी खोटे कथन करीत आहे. हे मला माहिती नाही की, त्या रिक्षाखाली एक मोटार सायकल पडली होती. हे म्हणणे खरे नाही की, सदर ठिकाणी रक्ताचे डाग पडलेले होते. हे म्हणणे खरे आहे की, पोलीसांनी सदर ठिकाणी पंचनाम्यातील मजकुर आमच्यासमक्ष लिहुन नकाशा रेखाटला होता. हे म्हणणे खरे आहे की, त्यानंतर त्यावर पोलीसांनी माझ्या स्वाक्षऱ्या घेतल्या होत्या. पोलीसांनी प्रकरणातील दाखल छायाचित्रांपैकी केवळ अनुक्रमांक ०३ ते ०६ कडील छायाचित्रे माझ्यासमक्ष घेतली होती. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी माझ्या ओळखीचा आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी आरोपीला वाचविणेसाठी आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

**सरतपास पुर्ण.**

**<u>उलटतपास – आरोपीतर्फे विधीज्ञ श्री. आर. के. शिंदे यांच्याकडुन</u> –**

**०४**. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या म्हणण्याप्रमाणे दिनांक ०६/०५/२०२४ रोजी केल्या होत्या. हे म्हणणे खरे आहे की, त्यावेळी मुंबई–गोवा महामार्गावरील वाहतुक सुरळीत चालु होती. हे म्हणणे खरे आहे की, मी सही केली त्यावेळी त्याठिकाणी कोणतेही अपघातग्रस्त वाहन नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, माझी सही घेतलेल्या ठिकाणामध्ये पोलीसांनी काय मजकुर नमुद केला होता, हे मला

सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, दिनांक ०६/०५/२०२४ रोजीच मी माझ्यासमक्ष रेखाटण्यात आलेल्या नकाशावर मी सही केली होती.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर निवेदन स्विकृत,

ROHINI RAJENDRA KULKARNI

Digitally signed by ROHINI RAJENDRA KULKARNI
Date: 2025.12.19 11:50:16 +0530

**(रोहिणी आर. कुलकर्णी)**

दि. १८.१२.२०२५ न्यायदंडाधिकारी वर्ग–१ देवरुख,

स्थळः देवरुख जि. रत्नागिरी.

-:CERTIFICATE:-

I affirm that the contents of this Pdf file order are same words as per original order.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | :- | S. A. Bhale |
| Court Name | :- | The Court of Civil Judge (J.D.) & Judicial Magistrate F.C., Deorukh |
| Date | :- | 18/12/2025 |
| Evidence signed by PO. on | :- | 18/12/2025 |
| Evidence uploaded on | :- | 19/12/2025 |